# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. ०४/१२/२०२०

आज शुक्रवार दि. ०४/१२/२०२० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी १०.३० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. २६/११/२०२० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| ११) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १२) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १३) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १४) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १५) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १६) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| १८) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| १९) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २०) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २१) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २२) | जैन गीता भरत | सदस्या |
| २३) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २४) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २५) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २६) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| २७) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २८) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| २९) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३०) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३१) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३२) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३३) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३६) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३८) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ३९) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४०) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४१) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४२) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४३) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४४) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४५) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४६) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५०) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५१) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५२) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५३) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५४) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५५) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५६) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५७) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५८) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५९) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६१) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६२) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६३) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६४) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६५) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६७) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६८) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६९) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७०) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७१) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७६) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७७) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७८) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ७९) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| २) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ४) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ५) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| ६) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ७) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ८) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ९) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| १०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ११) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| १२) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| १३) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| १४) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |

**<u>रजेचा अर्ज -</u>** निरंक

**नगरसचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांचे आजच्या महासभेमध्ये स्वागत आहे. आपण सर्वांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरम साठी आपल्या जागेवर उभे राहायचे आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने, सभासुचना टाईप करणे. व्हिडीयो कॉन्फरन्सींगद्वारे आपण आजची सभा घेत आहोत आणि ह्या करिता सभा सुचने सोबत आपल्याला व्हिडीयो कॉन्फरन्सींगच्या ज्या काही आवश्यक सुचना आहेत त्या दिलेल्या आहेत त्यानुसार आपण कामकाज सुरुवात करणार आहोत . सर्वप्रथम आजच्या विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यापूर्वी प्रशासनाकडून 2 के खाली एक प्रस्ताव आलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपले सदस्य रोहिदास पाटील त्यांना अनम्युट करा . त्यांना सभागृहाला संबोधीत करायचे आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील काका बोला.

रोहिदास पाटील :-

आज सभेला सुरुवात होते वेळी महापौरांच्या परवानगीने बोलतो अनेक महासभा गे ल्या त्यातली आजची सभा ही वेगळी सभा आहे . आपल्या महापालिकेचे माजी महापौर तुळशीदास दत्तु म्हात्रे त्यांचे दु:खद निधन झाले. पूर्ण शहर त्या दु:खात सहभागी झाले दु:खी आहेत. आजची सभा ही अत्यंत दु:खी अंतकरणाने सभेला सुरुवात करत आहोत . मला काही सुचेना उजाळा देण्याचा माझे कर्तव्य आहे. सुरुवातीच्या काळात मा. मोरेश्वर पाटील यांच्या नेतृत्वाखाली तुळशीदास दत्तु म्हात्रे, रोहिदास पाटील आणि अनेक कार्यकर्ते हे काम करीत होते . ग्रामपंचायतमध्ये तुळशीदास दत्तु म्हात्रे सदस्य होते. त्याच ग्रामपंचायतमध्ये शेवटच्या वर्षात ते सरपंच झाले त्यांची सरपंचाची कारकीर्द नंतर परिषद झाली. परिषदेमध्ये ही ते सदस्य राहिले. परिषदेमध्ये त्यांनी उपनगराध्यक्ष पण पद सांभाळले. महापालिका झाली महापालिकेचे सदस्य राहिले महापालिकेत ते महापौर राहिले . आगरी समाजाचे महापौर म्हणून आम्हाला शहराला त्यांचा अत्यंत आ नंद होता त्यांची कारकिर्द म्हणजे आजच्या दिवसात सांगायला मला अत्यंत जळ होत आहे तुळशीदास दत्तु म्हात्रे खरोखरच त्यांचे राहणीमान कतृत्व भोळा शंकर महादेव सारखी त्यांची प्रतिमा होती . समाजातील सर्व घटकांना मग ते मच्छीमार असु देत, ख्रीश्चन असु दे, हिंदु असु दे किंवा व्यापारी असु दे, मुसलमान असु दे अशा सर्व धर्मांच्या लोकांना त्यांनी आपलेसे केले. आपले म्हणून त्यांना जे कर ता येईल ते त्यांनी केले. मला दोन तीन गोष्टींचा उल्लेख करावासा वाटतो गेल्या वेळी काम करत होते. सुरुवातीच्या काळात त्यांच्या बरोबर मी काम करत होतो. काही काळानंतर त्यांच्या आमच्यात विचारसरणीमध्ये बदल झाला ते काँग्रेस पक्षाचे काम करत राहिले आम्ही राम नाईकांच्या बरोबर भारतीय जनता पार्टी तसे काम करत राहिलो . शेवटच्या दिवसांपर्यंत आमचे यांचे मतभेदच राहिले . सांगितले तर काही चुक नाही . पण हे खरं होते त्यांच्यात मतभेद कधीच नाही . एकदम कौटुंबिक वातावरणामध्ये म्हात्रे साहेबांनी आम्हाला वागणुक दिली किंवा आम्ही त्यांना तशीच दिली. त्यांचा मान सन्मान आम्ही कायम ठेवला. मला एक सांगावेसे वाटते की ज्यावेळी ते कार्यरत होते आमचे कामच होते त्यामुळे आम्ही टीकाच करत होतो . हे ही खर सांगतो टिका करणेच आमचे कर्तव्य होते. पण ज्यावेळी आम्ही बसत होतो ज्याचे कर्तव्य आहे म्हात्रे साहेब ते म्हात्रे साहेबच होते . सर्व सूचना ते ऐकून घ्यायचे . सभागृहात सांगावेसे वाटते ते खूप ओरडायचे खाली बसा खाली बसा मध्येच भाऊजी तुम्ही खाली बसा हे माझ्या काळ जात आजही आहे. म्हात्रे साहेब आपल्यात नाही . तो एक प्रसंग झाला , आम्ही त्याच्याशी वाटाघाटी केल्या बोलण केल त्यावेळी एक शब्द दिला की भावजी परत सुरु करा . शेवटच्या दिवसापर्यंत पाठीमागे राहिले आम्हाला मार्गदर्शन केले. त्यांचा एक प्रसंग सांगावासा वाटतो. ह्या सभागृहामध्ये आगरी समाज उन्नती संस्थेची स्थापना केली होती. त्या समाजाला जागा मिळावी म्हणून आरक्षण क्र. 122 मध्ये दोन एकरचा भूखंड मिळावा म्हणून प्रयत्न करत होतो. त्यावेळी म्हात्रे साहेबांनी एक मताचा ठराव करून आगरी समाजाला दिलासा दिला होता. एक प्रसंग सांगावेसे वाटते ज्यावेळी सदानंद बाबा यायचे होते मंडपाचे काम सुरु झाले त्यावेळी नारळ फोडायला म्हात्रे साहेब आले त्यावेळी म्हात्रे साहेबांनी सांगितले काका तुम्ही हे काम सुरु करा. तुम्ही ह्याची सी.सी. घ्या. मी तुमच्या पाठीशी आहे. एकदा सी.सी. घेतल्यावर आपण आदर्श आगरी भवन बनवू या अशी त्यांची भूमिका होती. आज खूप वाईट वाटते. म्हात्रे साहेबांनी खूप कामे केली मा. आयुक्त राऊत साहेबांनी सी.सी. दिली ते ऐकायला राऊत साहेब नाहीत. ज्या-ज्या वेळी म्हात्रे साहेबांनी काम केली. गोरगरिबांची काम केली ते अनेक संस्थेमध्ये होते. सहकारी संस्था, शिक्षण संस्था, अभिनव शेतकरी संस्थेचे ते सभासद होते . आता ते अध्यक्ष होते काम करत राहिले . सर्वांना दिलासा देत राहिले. म्हात्रे कुटुंबाना हे दु:ख सहन करण्याची शक्ती मिळो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो मी माझी श्रध्दांजली अर्पण करतो.

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम शिवसेना पक्षाच्या वतीने आदरणीय माजी महापौर तुळशीदास म्हात्रे साहेबांना त्यांच्या कार्याचा आढावा त्यांचा स्वभाव त्यांची सर्व माहिती काकांनी आपल्यासमोर ठेवली आहे. जरी ते काँग्रेसचे महापौर होते तरी त्यांचे सहकार्य सर्व पक्षाना लाभले होते. असे हे सर्वांना घेऊन चालणारे होते. महापौर म्हणून कार्यकाल होता आणि ह्या मिरा भाईंदर शहरासाठी त्यांचे योगदान आहे. शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना मन :पूर्वक आदरांजली वाहते. मा. महापौर मॅडम आपणास एक विनंती आहे मिरा भाईंदर शहराचे माजी महापौर म्हणून कारकीर्द असल्या कारणाने अशा व्य क्तीचे निधन झालेले आहे तर आपण श्रध्दांजली म्हणून ही महासभा तहकुब करावी अशी आपणांस विनंती करते.

धृवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम आपले धन्यवाद. आदरणीय तुळशीदास म्हात्रे साहेब मिरा भाईंदर शहराचे माजी महापौर होते . मिरा भाईंदर शहर छोट्या मोठ्या गावांना एकत्र करुन झालेले शहर आहे . छोट्याशा गावामध्ये म्हात्रे साहेब सरपंच होते. सरपंच पदाच्या कारकिर्दीत त्यांनी गावाचा विकास केला. मिरा भाईंदर नगरपरिषद झाल्यावर ते नगरपरिषदेवर निवडून आले . त्या काळामध्ये त्यांनी वेगवेगळ्या समितीचे सभापती पद भूषवले आहे . राजकारणामध्ये असताना त्यांनी मिरा भाईंदर जनतेसाठी मिरा भाईंदर सेवा सहकारी सोसायटीच्या माध्यमातून सुमारे 15 आरक्षण त्यांनी विविध ठिकाणी सुरु केले आणि गोर गरिब जनतेला स्वस्तात धान्य त्यांनी मिळवून दिले . मिरा भाईंदर शहरामध्ये अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाची त्यांनी शाळा चालू केली त्यानंतर चांगले कॉलेज त्यांनी उभे केले. त्यामध्ये हजारो विद्यार्थी घडले. सगळ्यांशी हसतमुखानी बोलायचे.

प्रभात पाटील :-

आजच्या महासभेत ह्या शहराचे माजी महापौर तुळशीदास म्हात्रे साहेबांना श्रध्दांजली वाहण्याचा जो कार्यक्रम चालू आहे म्हणण्यापेक्षा आपले जे कर्तव्य आहे तर अशा व्यक्ती विषयी ज्या शहराने एक खेडेगाव ते महानगर असा जो प्रवास केला आहे . ह्या प्रवासामध्ये ह्या शहराची जडण घडणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे अशा ह्या शहराचे माजी सरपंच , माजी उपनगराध्यक्ष, माजी महापौर अशी विविध पदे भूषविलेल्या मा . तुळशीदास म्हात्रे यांना माझा साष्टांग नमस्कार आहे . कारण ह्या शहराच्या प्रत्येक रचनेमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे . ह्या शहरामध्ये विविध उपक्रम राबवले गेले ह्या शहराच्या विकासामध्ये महत्वाचे निर्णय घेतले गेले ते संपूर्ण निर्णय प्रक्रियेमध्ये मा . तूळशीदास म्हात्रे साहेबांचा कधी सरपंच म्हणून तर कधी नगरसेवक तर कधी महापौर म्हणून त्यांचा वाटा होता हे आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही. अशा व्यक्तीस माझे विनम्र अभिवादन आहे . मला एवढेच सांगायचे आहे ह्या व्यक्तीचे मोल आपल्याला करता येणार नाही. परंतु माझी एक विनंती आहे. खास त्यांच्या शब्दामध्ये जेव्हा शासन आणि प्रशासन हातात हात घालत चालत नाही असा प्रसंग जेव्हा मा. महासभेमध्ये निर्माण व्हायचा त्यावेळी त्यांचे एक वाक्य होते आंधळे दळते आणि कूत्र पिठ खाते. माझी आजच्या सभेमध्ये सर्वांना ही विनंती राहील ह्या शहराला त्यांच्या स्वप्ना प्रमाणे त्यांच्या दूरदृष्टीप्रमाणे पूढे न्यायचे असेल तर शासन प्रशासनानी हातात हात घालून काम केले पाहिजे की अशी परिस्थिती होवू नये की आंधळ दळते आणि कूत्र पिठ खाते ही त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल . माझ्या वतीने त्यांना खूप खूप श्रध्दांजली आणि महापौर मॅडम मी आपणास आणखी एक गोष्ट इथे सांगू इच्छिते की गेल्या महिन्यामध्ये ह्या शहरामध्ये शेवटची धूरा असलेले स्वातंत्र्य सैनिक आत्माराम राजाराम भोईर ह्यांचे सुध्दा गेल्या महिन्यात निधन झाले आहे . त्यांना देखील आपण आदरांजली वाहू शकलो नव्हतो . ह्या निमित्ताने आजच्या महासभेत श्रध्दांजी अर्पीत करण्यात यावी अशी माझी विनंती आहे . एक गोष्ट मला सांगाविशी वाटते कदाचित आपल्या आचार संहितेमध्ये नसेल तर आपणास ती आचार संहितेत आणावी अशी माझी विनंती आहे . माजी महापौरांचे जेव्हा

निधन झाले त्यावेळी ह्या शहरामध्ये महापालिकेचा प्रतिनिधी म्हणून एकही माणूस तिथे उपस्थित नव्हता ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे . कदाचित आपल्या आचार संहितेत ती गोष्ट नसेल तर ती आपल्याला आणावी लागेल. कारण महापौरसारखे प्रथम पद भूषविलेली व्यक्ती इतकी सिनियर व्यक्ती अशी जर ह्या शहरामधून निघून जात असेल तर महापालिकेच्या वतीने किमान एक पूष्पगुच्छ घेऊन जाण्यासंदर्भात प्रोव्हिजन आपल्याकडे असावे . नसेल तर करण्यात यावे असे मी मा . आयुक्त, मा. उपायुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर आहेत प्रोसिजर नाही असे सांगितले जाते ती प्रोसिजर ह्या ठिकाणी करावी ह्यापूढे अशा घटना शहरात होऊ नये अशी निश्चितपणे काळजी घेण्यात यावी . धन्यवाद.

दिनेश जैन :-

मा. महापौर मॅडम, आज मिरा भाईंदर महापालिकेचे माजी महापौर आदरणीय तुळशीदास म्हात्रे साहेबांच्या निधनाने एक फार मोठा व्यक्ती आपण गमावलेला आहे . मला आज सांगायला अभिमान वाटतो आज माझी स्वत:ची जडणघडण ज्या शहरात झाली ती तुळशीदास म्हात्रे साहेबांच्या हातात हात धरुन मी आज इथपर्यंत आलो आहे म्हात्रे साहेबांच्या बाबतीत जेवढा इतिहास त्यांच्या कुटुं बियांना माहित आहे तेवढच इतिहास मला देखील माहित आहे . कारण रोज त्यांच्या घरी जाण येण त्यांच्या बरोबर फिरण बोलण त्यांच्याकडून जे काय शिका यच ते मी शिकून घेतले . आज ह्या शहराने फार मोठी व्यक्ती गमावलेली आहे मी त्यांचा महापालिकेतील थोडा फार किस्सा सांगेन . तुळशीदास म्हात्रे ज्यावेळी महापौर होते त्यावेळी सभा चालवताना त्यांच्याकडे जी सभा होती ती कला अशी होती कोणालाही राग येण नव्हते. प्रत्येकांना सांभाळून घ्यायचे त्यांनी कधी पक्ष पाहिला नाही. त्यांनी सर्वांना मानसन्मान दिला. प्रत्येक वेळेला हसत खेळत कधीही भांडण झाले नाही. निष्कलंक महापौर अशी नोंद मिरा भाईंदर शहरामध्ये झाली आहे . त्यांच्यावर कसलेही आक्षेप झाले नाहीत . कोणत्याही पत्रकारांनी त्यांच्याबाबत काही खोटे छापले नाही अशा व्यक्तीला मी अभिवादन करतो . म्हात्रे साहेबांच्या जाण्याने माझे देखील नुकसान झालेले आहे मी त्यांना आदरांजली वाह तो आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दु :खात मी देखील सहभागी आहे. धन्यवाद.

जुबेर इनामदार :-

ह्या शहरावर दु:खाचा प्रसंग आला आहे कारण ह्या शहराला घडताना तयार होताना बघणारे त्यांचा सिंहाचा वाटा आहे . ह्या शहराच्या विकासाच्या कामामध्ये होता असा व्यक्ती आज आपल्यामध्ये नाहीत. आम्ही तर त्यांना आमच्या पक्षाचे भिष्म पितामह म्हणून मानतो . त्यांनी कधी पक्षपात केला नाही. जो कोणी त्यांच्याकडे गेले तेव्हा त्यांचे जमेल ते काम त्यांनी केले . प्रेमळ होते भावूक होते. सामान्य वृत्तीचे असणारे म्हात्रे साहेब त्याच्याबद्दल खरतर माझ्यासारखे छोटेसे कार्यकर्ते काका बोलले ते खरे आहे . मला देखील त्यांच्या बरोबर काम करायला , मला त्यांच्याकडून शिकायला मिळाले. माणसांनी संकटावर कशी मात द्यावी . मवाळ भूमिका घेऊन लोकांना विश्वासात घेऊन हे महत्वाचे कार्य असते . नेहमी बोलायचे कोणी तलवारीने माझ्या छातीला दोन छिद्र केले नाही तरी काळजातून बाहेर पडणार फक्त निरंक असेल . काळजामध्ये तिरंगा फडफडताना दिसेल असे हे आमचे तुळशीदास म्हात्रे साहेब त्यांचे नेहमी खडे बोल असायचे . तुळशीदास म्हात्रे साहेब दि. 1 डिसेंबर रोजी ह्यांचे निधन झाले आहे . त्यांना नतमस्तक वंदन निळेसागर , हिरवे डोंगर , शुभ्र मिठागर तरुण उद्योजका समूह उभे करुन नविन मिरा भाईंदर हे त्यांचे स्व प्न होते. स्वर्गवासी तुळशीदास म्हात्रे साहेब ह्यांचा जन्म 6/03/1945 रोजी झाला. जिवनाची 46 वर्ष सामाजिक व राजकीय कार्याच्या चळवळीतील प्रवासामध्ये आपली कर्तव्ये पार पाडताना भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निष्ठावान असे थोर परिचयाचे राखून रक्तात तिरंगा असल्या चे ग्वाही देऊन जिल्हाध्यक्ष पदावर काम करुन काँग्रेस पक्षाचे संघटनात भाग घेतला. मिरा भाईंदर शहराचे 10 वर्ष ग्रामपंचायत सरपंच राहून विकसित होत असलेले नविन शहराची जबाबदारी उचलली. त्यावेळेचे मिरा भाईंदर नगरपालिका उपनगराध्यक्ष पदावर

त्यांनी काम केले. मिरा भाईंदर महापालिकेत 2005 ते 2006 स्थायी समिती सभापती राहिले. 2009 मध्ये ठाणे जिल्हा नियोजन समितीवर त्यांची निवड झाली . अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे 93 पासून 8 वर्ष अध्यक्षपद भूषविले. मिरा भाईंदर सेवा सहकारी संस्थेचे 93 ते 2020 पर्यंत 24 वर्ष अध्यक्षपदी विराजमान हो ते. अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेचे 2011 पासून हयात असेपर्यंत अध्यक्ष राहिले तसेच मिरा भाईंदर शहराचे 2010 मध्ये प्रथम नागरिक मा . महापौर पदावर निवडून येऊन पदाला सन्मानित केले . अनेक विविध शैक्षणिक व सामाजिक कला क्रिडा सांस्कृतिक संस्थेमध्ये विविध पदावर कार्य क रणारे आज आपल्या सोबत नाहीत . अनंतात विलीन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो. त्यांच्या कुटुंबाला हे दु:ख सहन करण्याची शक्ती देवो. ही इश्वरचरणी प्रार्थना. माझ्या व संपूर्ण काँग्रेस पक्षाच्या वतीने तसेच पूर्ण सभागृहाच्या वतीने स्वर्गवासी तुळशीदास म्हात्रे साहेबांना आजची आदरांजली हीच आमची श्रध्दांजली . तसेच महापौर मॅडम भविष्यात होणारी महापालिकेची इमारत त्यांच्या नावाने करावी . मा. महापौर मॅडम हया दु:खाच्या प्रसंगामध्ये ही सभा तहकूब करावी अशी आपणास विनंती आहे. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जे ष्ठ नेते खासदार एहमद भाई मोहमदभाई पटेल हे काँग्रेस पक्षाचे प्रमुख सल्लागार म्हणून होते त्यांचे ही निधन 26/11 रोजी झाले आहे मी त्यांना ही श्रध्दांजली वाहतो.

रिटा शाह :-

मिरा भाईंदर शहराचे महापौर तुळशीदास म्हात्रे साहेब हयांचे 1/12/2020 रोजी निधन झाले. त्याबद्दल त्यांना विनम्र अभिवादन. सरपंच, उपनगराध्यक्ष, महापौर हया शहराचे त्यांनी चांगले नेतृत्व केले आहे. त्याच्याही पेक्षा काँग्रेस पक्षाचा एक सफल जिल्हाध्यक्ष म्हणून हया शहराची वाटचाल पूढे दिली आहे त्याबद्दल त्यांचे अभिवादन करत आहे आणि विनम्र आदरांजली देत आहे.

अनिल सावंत :-

आज संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये एक मोलाच रत्न आपण गमावले आहे . मिरा भाईंदर शहराचा खरा विकास करण्यामध्ये आमचे मोरेश्वर पाटील असे दे , कृष्णदेव म्हात्रे आणि तुळशीदास म्हात्रे जवळ जवळ वयाची 55 वर्ष हया सामाजिक कार्यामध्ये झोकून दिलेले तु ळशीदास म्हात्रे त्यांचे आज बरेच शिष्य महापालिकेच्या सदनामध्ये आहेत . मग ते कोणत्याही पक्षाचे असू दे . पण आज शहरामध्ये खऱ्या अर्थाने हया शहराचा विकास होत असताना हा परराज्यातला आहे, परकीय आहे असा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही आणि सर्वांना हया शहरामध्ये सामा वून घेतले. 55 वर्ष राजकीय निष्कलंग कारर्किद त्यांनी हया शहरासाठी दिली . काँग्रेस पक्षाचे फारच मोठे नुकसान झालेले आहे . कारण आम्ही सर्व मग मुझफ्फर हुसेन साहेब असू दे किंवा आम्ही नगरसेवक असू दे म्हात्रे साहेबांचे शिष्य म्हणून आमची राजकीय कारकिर्द सुरु केली . अनेक गोष्टी त्याच्याकडून शिकल्या . सामान्य नागरिक, सामान्य कार्यकर्ता त्यांची काम पहिली करा ही मोलाची शिकवण म्हात्रे साहेबांनी आम्हाला दिली आणि आज खऱ्या अर्थाने काँग्रेस पक्ष पोरका झाला . नगरपरिषदा, ग्रामपंचायत महापालिकेमध्ये मोठमोठ्या पोस्ट भूषविल्या संपूर्ण कारकिर्द निष्कलंक आणि दिनेश नलावडे हयांनी सांगितले महासभा चालवताना आमचे महापौर असताना देखील आम्हाला सांगायला लागायचे की आम्हाला बोलू द्या . विरोधी पक्षनेता, नगरसेवकांना बोलण्याची पहिली संधी म्हात्रे साहेबांनी दिलेली आहे . प्रभात ताईंनी मुद्दा मांडला माजी म हापौरांसारखी व्यक्ती हया शहरा तून निघून जाते त्यावेळी महापालिकेचा एकतरी प्रतिनिधी तिथे असणे गरजेचे होते . नविन प्रथा सुरु करतो त्याची आपण वाट बघत नाही . आज डायसवर सभागृह नेते सुध्दा दिसतात . चांगली गोष्ट आहे . त्यांच्याबरोबर विरोधीपक्षनेतांना घेतले असते तर चां गला पायंडा पडला असता असे म्हात्रे साहेब आपल्या सगळयातून निघून गेले . काँग्रेस पक्षातर्फे व्यक्तिश: माझे कौटुंबिक रिलेशन ज्या माणसाबरोबर होते फार जवळून हया माणसाला मी बघितले आहे. माझ्या कुटुंबियांतर्फे आणि काँग्रेस पक्षातर्फे भावपूर्ण आदरांजली मी वाहतो. जसे गटनेते

जुबेर इनामदार ह्यांनी सूचना केली आहे आजची सभा तहकूब करावी आणि थोड्या कालावधीत ही सभा बोलवावी अशी मी विनंती करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

प्रविण पाटील :-

मिरा भाईंदर महापालिकेचे तुळशीदास म्हात्रे ह्यांचे 1945 ते 2020 पर्यंत प्रवास राहीला आहे. त्यांच्या कारकिर्दीमध्ये..............

गिता जैन :-

सन्मा. माजी महापौर आणि आमचे जवळचे कौटुंबिक मित्र तुळशीदास म्हात्रे ते 30-35 वर्षा अगोदर आमच्या घरी यायचे मला सांगायचे मराठी शिक मी तुझ्यासाठी हिंदी बोलणार नाही. मी आज त्यांना मराठीत श्रध्दांजली वाहते . त्यांच्या आत्म्या ला चिरशांती लाभो , कुटुंबियांना दु :ख सहन करण्याची शक्ती देवो. इनामदार साहेबांशी मी सहमत आहे एखाद्या चांगल्या वास्तूला त्यांचे नाव द्या. चांगला पायंडा पडावा की माजी महापौरांना आपण कसा आदर देऊ शकतो आणि हा प्रोटोकॉल पण पाळावा. जर महापौर, उपमहापौर, सभागृह नेता महत्वाचे व्यक्ती जेव्हा आपण गमावतो तेव्हा महापालिकेकडून एखादा व्यक्ती उपस्थित राहू शकत नाही ही खेदाची बाब आहे . हा पण प्रोटोकॉल आपण द्यावा आणि ही सभा तहकूब करावी अशी विनंती आहे.

चंद्रकांत वैती :-

आदरणीय महापौर मॅडम, मिरा भाईंदरमध्ये 19 गावांचे नेतृत्व करणारे ह्या शहरामध्ये एक राजकीय व्यक्ती मत्व म्हणजे गोरगरीबांची एकच असा आमचा नेता तुलशीदास म्हात्रे साहेबाबद्दल बोलले जायचे. एक सर्वसाधारण माणसाचे सर्वसाधारण नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले आहेत . मिरा भाईंदर नगरपरिषद होती तेव्हा त्याचे नेतृत्व त्यांनी केले. महापालिका होती तेव्हाही नेतृत्व केले. अभिनव शिक्षण संस्थेमध्ये त्यांनी नेतृत्व केले. तसेच भाईंदर सेवा सहकारी सोसायटीमध्ये 18 वर्ष ते त्यांनी अध्यक्ष म्हणून काम केले . कधी पदाचा, वयाचा किंवा नेतृत्वाचा मोठेपणा दाखवला नाही . अत्यंत साधेपणाने प्रत्येकाला अशी जणी व आहे की माझा कुटूंबप्रमुख आहे अशा पध्दतीचे म्हात्रे साहेबांचे काम होते. त्यांनी त्याचा मोठा परिवार जशा शांतपणे सांभाळला तसे मिरा भाईंदरला आपला परिवार समजून सांभाळत होते. मी तेव्हा कॉंग्रेस पक्ष सोडायची तयारी केली त्यावेळी म्हात्रे साहेबांनी मला सांगितले असे काय करु नको. तु माझ्या मुलासारखा आहेस. तुला असे सोडून चालणार नाही. आपण ही जबाबदारी घेतली आहे असे अत्यंत महत्वाने समजवणारे नेतृत्व आपल्यातून गेलेत . जेव्हा जेव्हा त्या परिसरात माझे जाणे व्हायचे तेव्हा म्हात्रे साहेबांना आवर्जुन भेटायचो . त्यांच्या जाण्याने शहरात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या नावाने निश्चितच वास्तु असावी. महापालिकेने या संदर्भात चांगला निर्णय घ्यावा आणि कायमस्वरुपी अनेक पिढ्यांसमोर त्यांच्या चिरस्मरणात म्हात्रे साहेबांचे नाव आणि कार्याचा गवगवा व्हावा त्या वस्तुच्या ठिकाणी त्याच्या जीवनपटलावर थोडीशी माहिती लिहली पाहिजे. सर्व मिरा भाईंदर क्षेत्रातील 19 गावातर्फे आणि शहर वासियांतर्फे मी म्हात्रे साहेबांना विनम्र अभिवादन करतो. त्यांच्या चरणांशी नतमस्तक होतो. इश्वरचरणी एकच प्रार्थना आहे देवाच्या दरबारात, देवाच्या पायाशी त्यांना जागा मिळो.

प्रशांत दळवी :-

मा. महापौर मॅडम, आज सर्व सन्मा. सदस्यांनी स्व. कॉंग्रेसचे जेष्ठ नेते तुलशीदास म्हात्रे साहेब ह्यांच्याबद्दल दु :ख व्यक्त केले आहे . मी सभागृहाच्यावतीने शोकप्रस्ताव मांडत आहे . मिरा भाईंदर मधील कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते , राजकारणा पेक्षा समा जकारणाला नेहमीच महत्व देत आलेले कॉंग्रेस पक्षाच्या तळागाळाचे कार्यकर्ते , सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, स्थायी समिती सभापती , उपमहापौर व महापौर पदी विराजमान झालेले मिरा भाईंदर महापालिकेचे माजी महापौर स्व . तुलसीदास म्हात्रे यांचे मंगळवारी सकाळी दिर्घ आजाराने निधन झाले, ते 75 वर्षांचे होते.

काँग्रेसचे कट्टर निष्ठावंत स्व. तुळशीदास म्हात्रे जे स्पष्टवक्ते आणि दुरदृष्टिकरीता परिचित होते, त्यांनी पक्षाचा पाया मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली . शहरातील सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी त्यांनी केलेले नि:स्वार्थ योगदान कायम आठवणीत राहील. गेले काही महिने ते आजारी होते, त्यातुनच मंगळवार दि.01 डिसेंबर 2020 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना करुन म्हात्रे साहेबांचा आता सहवास जरी नसला तरी त्यांच्या स्मृति सदैव स्मरणात राहतील , राजकारण व समाजकारणाच्या प्रत्येक वळणावर त्यांची आठवण राहील हीच भावपूर्ण श्रद्धांजली देतो.

तसेच स्वतंत्र सेनानी स्व. आत्माराम राजाराम भोईर, अहम्मद मोहम्मद पटेल, ज्येष्ठ काँग्रेस नेते, आमदार स्व. भालचंद्र भालके व राजस्थान राज्याच्या पूर्व मंत्री /आमदार स्व. किरण महेश्वरी तसेच मसाला किंग महाशय धर्मपाल गुलाटी यांचे वयाच्या 98 वर्षी निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दल देखील ही सभा शोक व्यक्त करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहरामध्ये कोरोना प्रादुर्भावाने मृत्युमुखी पावलेल्या नागरीकांना देखील ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची शक्ती त्यांना देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना करुन आजची मा . महासभा तहकुब करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

मा. उपमहापौर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

मिरा भाईंदर मधील काँग्रेसचे जेष्ठ नेते व काँग्रेसच्या तळागाळातील कार्यकर्ते तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी महापौर व ज्यांनी अनेक पदे भुषवली असे स्व . तुलशीदास म्हात्रे साहेब ह्यांचे मंगळवारी सकाळी दिर्घ आजाराने निधन झाले . काँग्रेसचे कट्टर निष्ठावंत व स्पष्टोक्ते आणि दुरदृष्टीकरीता परिचित होते. त्यांनी काँग्रेस पक्षाचा पाया मजबुत करण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण भुमिका बाजावली . शहरातील सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि मिरा भाईंदरच्या विकासासाठी निस्वार्थपणे योगदान दिलेले आहे ते सर्वांच्या कायम आठवणीत राहील. गेले काही महिने ते आजारी होते. त्यातुनच मंगळवार दि. 01/12/2020 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनावर ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास दु:ख सहन करण्याची इश्वर त्यांना शक्ती देवो ही इश्वर चरणी प्रार्थना. म्हात्रे साहेबांचा सहवास जरी नसला तरी त्यांच्या स्मृती सदैव आपल्या स्मरणात राहतील. राजकारण व समाजकारणाच्या प्रत्येक वळणावर त्यांची आठवण ही आपल्यामध्ये सदैव राहील हीच आपल्याकडून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली मी देते. तसेच सन्मा. सदस्या निलम ढवण, सन्मा. सदस्य जुबेर इनामदार सन्मा. विरोधी पक्षनेते प्रविणजी पाटील , सन्मा. सदस्या गीता जैन मॅडमजी व सभागृहनेते प्रशांत दळवी साहेब , ह्यांनी केलेल्या सुचनेनुसार आजची सभा सभागृहातील सर्व सदस्यांच्या दु:खद भावना लक्षात घेवून सभा तहकुब करण्यात येत आहे आणि सोमवार दि . 07/12/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता ही महासभा घेण्यात येईल असे सर्वांना सांगण्यात येते.

दु:खवठा व सभा तहकुबी ठराव क्र. 21 :-

मा. महापौर मॅडम, आज सर्व सन्मा. सदस्यांनी स्व. काँग्रेसचे जेष्ठ नेते तुलशीदा स म्हात्रे साहेब ह्यांच्याबद्दल दु :ख व्यक्त केले आहे . मी सभागृहाच्यावतीने शोकप्रस्ताव मांडत आहे . मिरा भाईंदर मधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते , राजकारणा पेक्षा समाजकारणाला नेहमीच महत्व देत आलेले काँग्रेस पक्षाच्या तळागाळाचे कार्यकर्ते , सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, स्थायी समिती सभापती , उपमहापौर व महापौर पदी विराजमान झालेले मिरा भाईंदर महापालिकेचे माजी महापौर स्व . तुलसीदास म्हात्रे यांचे मंगळवारी सकाळी दिर्घ आजाराने निधन झाले, ते 75 वर्षांचे होते.

काँग्रेसचे कट्टर निष्ठावंत स्व. तुळशीदास म्हात्रे जे स्पष्टवक्ते आणि दुरदृष्टिकरीता परिचित होते, त्यांनी पक्षाचा पाया मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली . शहरातील सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी त्यांनी केलेले नि:स्वार्थ योगदान कायम आठवणीत राहील. गेले काही महिने ते आजारी होते, त्यातुनच मंगळवार दि.01 डिसेंबर 2020 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना करुन म्हात्रे साहेबांचा आता सहवास जरी नसला तरी त्यांच्या स्मृ ति सदैव स्मरणात राहतील , राजकारण व समाजकारणाच्या प्रत्येक वळणावर त्यांची आठवण राहील हीच भावपूर्ण श्रद्धांजली देतो.

तसेच स्वतंत्र सेनानी स्व. आत्माराम राजाराम भोईर, अहम्मद मोहम्मद पटेल, ज्येष्ठ काँग्रेस नेते, आमदार स्व. भालचंद्र भालके व राजस्थान राज्याच्या पूर्व मंत्री/आमदार स्व. किरण महेश्वरी तसेच मसाला किंग महाशय धर्मपाल गुलाटी यांचे वयाच्या 98 वर्षी निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दल देखील ही सभा शोक व्यक्त करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहरामध्ये कोरोना प्रादुर्भावा ने मृत्युमुखी पावलेल्या नागरीकांना देखील ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची शक्ती त्यांना देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना करुन आजची मा . महासभा तहकुब करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

सर्वांनी स्वर्गवासी माजी महापौर तुलशीदास म्हात्रे ह्यांना ह्या सभागृहातर्फे तसेच पालिका प्रशासनातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आपल्या जागेवर शांत उभे रहायचे आहे.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका